पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## समाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ

## वार्षिक अहवाल २०१७–१८

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## समाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ

## वार्षिक अहवाल २०१७–१८

### १) उद्‌घाटन :–

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मधील सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन दि. ८ सप्टेंबर २०१७ रोजी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. आश्रुबा गवळी, शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. डॉ. आश्रुबा गवळी यांनी या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या स्थापणेचा उद्देश स्पष्ट केला. समाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री निवृती गाडेकर व उपाध्यक्ष म्हणून श्री सोमीनाथ सहाणे यांचे स्वागत करण्यात आले.

### २) भिंतीपत्रक प्रकाशन :–

दि.२ ऑक्टो. २०१७ रोजी सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने कु. सरला दाढे या विद्यार्थीनीने बनविलेले 'स्वच्छ भारत' या विषयावरील भिंतीपत्रक महात्मा गांधी जयंती कार्यक्रमात प्रकाशित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे वक्ते श्री बाबासाहेब दाभाडे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांच्यासह सामाजिकशास्त्राचे विद्यार्थी उपास्थित होते.

### ३) लोकशाही पंधरवडा :–

महाराष्ट्र शासनाने २६ जाने २०१८ ते 10 फेब्रुवारी २०१८ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या त्यानुसार लोकशाही विषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने 'लोकशाही व्यवस्थेची ओळख' या विषयावर डॉ. रामकिशन लोमटे व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन केले. याबरोबरच ग्रंथलयाशेजारील फलकावर 'मतदान यादीत नाव नोंदणी करा व भारतीय लोकशाही मजबूत करा' अशा आशयाची सूचना विद्यार्थ्यांसाठी लावण्यात आली.

## ४) सामान्य ज्ञान चाचणी :–

दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी सामान्य ज्ञान चाचणी घेण्यात आली. या उपक्रमात एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## ५) भिंतीपत्रक प्रकाशन :–

समाजिकशास्त्रांचे 'महिलांचे हक्क' या विषयावर बनविलेले भिंतीपत्रक दि.०५/०३/१८ रोजी प्रा. किशोर काळे, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद यांच्या हस्ते प्रकाशित केले. अतिथी व्याख्यान देण्यासाठी आलेल्या प्रा. किशोर काळे महाविद्यालयात उपस्थित होते.

कार्यक्रम फोटो




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन–अतिथींच्या हस्ते पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन–संचलन करताना विद्यार्थी




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे प्रथम सत्रातील भिंतीपत्रक प्रकाशन




सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे द्वितीय सत्रातील भिंतीपत्रक प्रकाशन

डॉ. लोमटे आर. व्ही.